# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ५९८/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.सुर्यकांत केशव शिंगे**

नर्मदा निवास, माऊली हॉस्पिटलच्या जवळ

साकेत रोड, बाळकुम, पाडा नं.२, जि.ठाणे ४०० ६०८.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी, जमिनबाब संकलन
तहसिल कार्यालय ठाणे, ठाणे स्टेशन रोड,
ता.जि.ठाणे ४०० ६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी, जमिनबाब संकलन
तहसिल कार्यालय ठाणे, ठाणे स्टेशन रोड,
ता.जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.०५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४.१२.२०१९ | -- | २२.०२.२०२० | ०६.०१.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. ३१.०३.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही."*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.०५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिनेश पैठणकर, निवासी नायब तहसिलदार यांचे प्रतिनिधी श्री.जतिन ससाणे, अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, ठाणे उपस्थित आहेत.

तक्रांरकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"शासनाची परवानगी न घेता बेकायदेशिररित्या विहिर बुजावल्याबाबत बिल्डर श्री.धिरज पोपटलाल शहा (देढियाट व श्री.मुकेश पोपटलाल शहा (देढिया) यांच्यावर कायदेशिर कारवाई करणेबाबत नायब तहसिलदार मा.उपविभागीय अधिकारी कार्यलिय, ठाणे यांचया कार्यालयाकडून दि.०३.०६.२०१९ रोजी हस्तांतरित केलेल्या श्री.सुर्यकांत केशव शिंगे यांच्या दि.२९.०५.२०१९ रोजीच्या तक्रार अर्जावर केल्या गेलेलया कारवाइ संबंधी माहिती व इतर माहिती."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, दि.०६.०१.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

*“जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०७/०१/२०२१ रोजी समक्ष उपस्थित राहुन संचिका हाताळणीसाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यानुसार अपिलार्थी यांच्या अर्जात नमूद केल्याप्रकरणी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.”*

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या तक्रार अर्जासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. आजच्या सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी सुनावणी दरम्यान सदर नस्तीचा शोध घेऊन, तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देऊ असे सांगितले. तथापि अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती देण्यासाठी जवळपास पाच वर्षाचा विलंब झालेला आहे. त्यानंतर आता नस्तीचा शोध घेण्यात येईल अश्याप्रकारचे उत्तर बेजबाबदारपणा दर्शविणारे आहे. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस तहसिलदार, तहसिल कार्यालय, ठाणे यांनी स्वत: माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा घेऊन उपस्थित राहणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय ठाणे यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४.१२.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तहसिलदार, तहसिल कार्यालय, ठाणे यांनी स्वत: उपस्थित राहून दि.०१.०८.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०१.०८.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ मे, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तहसिलदार, तहसिल कार्यालय, ठाणे व

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, जमिनबाब संकलन, तहसिल कार्यालय, ठाणे
**- यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,
जमिनबाब संकलन, तहसिल कार्यालय, ठाणे,
स्टेशन रोड, ठाणे, ता.जि.ठाणे ४०० ६०१.
**यांचेमार्फत रवाना.**